**दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारीचा सामना विषयक भारत-इटली संयुक्त कार्यगटाची 5 वी बैठक**

17 जानेवारी 2025

दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारीचा सामना विषयक भारत-इटली संयुक्त कार्यगटाची (JWG) 5 वी बैठक 16-17 जानेवारी 2025 रोजी इटलीमधील रोम येथे आयोजित करण्यात आली होती.

2. या बैठकीचे सह-अध्यक्षपद भारताच्या वतीने परराष्ट्र व्यवहार मंत्रालयातील दहशतवाद विरोधी विभागाचे सहसचिव श्री. के. डी. देवल आणि इटलीच्या वतीने इटलीच्या परराष्ट्र मंत्रालयातील राजकीय व्यवहार विभागाचे वरिष्ठ उपसंचालक आणि सुरक्षा विभागाचे संचालक श्री. अलेस्सांद्रो अझोनी यांनी भूषविले.

3. उभय बाजूंनी उदयोन्मुख देशांतर्गत, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय दहशतवादी धोक्यांबद्दल चर्चा केली आणि दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी विरोधी सहकार्याच्या विस्तृत क्षेत्रांवर विचारविनिमय केला.

4. दहशतवादी उद्देशांसाठी तंत्रज्ञानाचा गैरवापर प्रभावीपणे रोखण्यासाठी सहकार्य वाढविण्याची गरज ओळखून, उभय बाजूंनी या धोक्याला रोखण्यासाठी आणि कमी करण्यासाठी अनुभव सामायिक केला. दहशतवादी कृत्यांसाठी जबाबदार असलेल्यांवर प्रभावी खटला चालवण्यावर देखील त्यांनी भर दिला.

5. दोन्ही धोरणात्मक भागीदार देशांमधील संवादाने UN, GCTF आणि FATF सह बहुपक्षीय मंचांवर सहकार्य मजबूत करण्याच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. विविध द्विपक्षीय करारांवरील चालू वाटाघाटी पुढे नेण्याचे मार्ग आणि साधने यावरही उभय बाजूंनी चर्चा केली.

6. भारतीय शिष्टमंडळाने इटलीतील कॅसर्टा  येथील आंतर-एजन्सी कायदा अंमलबजावणी अकादमीच्या अधिकाऱ्यांना भेट दिली आणि अकादमी आणि भारतातील समकक्ष संघटनेमधील क्षमता बांधणी उपायांना बळकटी देण्याबाबत चर्चा केली.

7. उभय बाजूंनी संयुक्त कार्यगटाची पुढील बैठक दिल्लीत परस्पर सोयीस्कर तारखेला घेण्यास सहमती दर्शविली.

नवी दिल्ली

17 जानेवारी 2025